# सोळावं वरीस धोक्याचं !



- जगदीश खेबूडकर

1974 आ २

दर्जेदार ग्रामीण नाटक



# सोळावं वरीस धोक्याचं !

लेखक

कवि जगदीश खेबूडकर



शाहू जन्मशताब्दि प्रकाशन

सरकारी प्रमाणपत्र
डी. आर. एम्. ११५१६६

दुसरी आवृत्ति
१ फेब्रुवारी १९७४

प्रकाशक
चंद्रकांत शेळ्ये

प्रकाशन स्थळ
अत्रे सभागृह
शिवदर्शन
शिवाजी पथ
कोल्हापूर ४१६००२

मुद्रक
गो. ना. कुलकर्णी
सेवा मुद्रणालय
१६७ बी,
कोल्हापूर ४१६००२

मूल्य पाच रुपये

## जाणीव

या नाटकाचे प्रयोग, पुनर्मुद्रण, भाषांतर, चित्रपट वगैरे सर्व **हक्क वसंत दळवी, 'नाट्यप्रपंच' ११२० अबू मॅन्शन, ना. म. जोशी मार्ग, मुंबई १३** यांच्या स्वाधीन आहेत. हौशी नाट्यसंस्थेतर्फे या नाटकाचा प्रयोग फुकट असेल तर त्याचे मूल्य ४० रुपये व धंदेवाईक स्वरुपात तिकीट लावून असेल तर त्याचे प्रयोग मूल्य ५० रु. राहील. वरील पत्त्यावर प्रयोगापूर्वी १५ दिवस आधी प्रयोग मूल्य पाठवून परवानगी न घेतल्यास हे नाटक करणाऱ्या स्त्री-पुरुष कलाकार, दिग्दर्शक, संगीत दिग्दर्शक, वादक, रंगभूषाकार या सर्वांवर कायदेशीर इलाज केला जाईल व त्यातील प्रत्येक व्यक्तीकडून नुकसान भरपाई म्हणून प्रत्येकी १०० रुपये वसूल केले जातील.

— वसंत दळवी,
सूत्रधार 'नाट्यप्रपंच'

## मनोगत



नव्याने स्थापन झालेल्या एका नाट्यसंस्थेसाठी दहा दिवसांत लिहून झालेली ही (कला) कृति ! लोकनाट्य आणि नाटक यांच्या मिश्रणातून लोकांच्यासाठी निर्माण झालेलं हे नाटच ! सर्व थरांतल्या रसिकांना सामान्यपणे रुचणाऱ्या विशिष्ट मनोरंजनाचं एक संकलन आणि दुवे जोडणाऱ्या प्रसंगांतून सांधली जाणारी संवादगर्भ ग्रामीण कथा ! इतकंच.

या कलाकृतीमागं राबणाऱ्या बुद्धीत सिंहाचा वाटा माझ्या वडील बंधूंचा व एका सन्मित्राचा ! मी केवळ नामधारी– होऊ घातलेला लेखक ! प्रेक्षक आणि संस्था या दोघांच्या पदरांत समान माप टाकण्याचा सोपा, सरळ शुद्ध हेतु ! शिकवण्याचा नाही, थोडंफार शिकण्याचा ! एक छोट्या माणसानं घेतलेला हा मोठा घास स्तुति आणि टीकेबरोबरच पचला. रसिकांचा 'अर्थ' पूर्ण आश्रय, सादरकर्त्यांची योजनाबद्ध चिकाटी आणि कलावंतांची इमानी राबणूक यामुळं प्रयोगा दाखल लिहिलेल्या प्रयोगाचे असंख्य प्रयोग झाले, होताहेत व होतील ! पर्यायाने 'आधी नाट्यप्रपंच करावा नेटका' ही उक्ती सार्थ झाली, याचे श्रेय सर्वांनाच ! !

— जगदीश खेबूडकर

या नाटकाचा पहिला प्रयोग नाट्यप्रपंच, मुंबई या संस्थेने ता. २८–३–६१ रोजी रात्री ९।। वाजता नाट्याची पंढरी सांगली येथे सादर केला.

सूत्रधार : **वसंत दळवी व अनिल महाजन**

| | |
|---|---|
| लेखक व पद्यरचना | **जगदीश खेबूडकर** |
| दिग्दर्शक | **बी. माजनाळकर** |
| संगीत | **दत्ता डावजेकर** |
| संगीत सहदिग्दर्शक | **वसंत देव** |
| रंगमंच व्यवस्था | **बाळ बापट** |

## कलाकार

| | |
|---|---|
| **दौलती** | अरुण सरनाईक |
| **गजरा** | लीला गांधी |
| **चंदर** | बी. माजनाळकर |
| **तारा** | सुहासिनी शिरसाट |
| **मोतीराम** | गणपत पाटील |
| **बजाबा** | सुकुमार |
| **सावकार** | कमलाकर टाकळकर |
| **आबा** | एरन जोसेफ |
| **दाजीबा** | प्रभाकर तावरे |
| **सखाराम** | बबन काळे |

## वाद्यमेळ

| | | | |
|---|---|---|---|
| ऑर्गन | **वसंत देव** | ढोलकी | **बबन काळे** |
| क्लारिओनेट | **करीमखाँ** | तबला | **अंकुश जावळे** |
| पार्श्वगायक | **वसंत देव व लीला कारेकर** | | |

नेपथ्य, वेशभूषा, रंगभूषा

बबन शिंदे–रेखा मेकअप सर्व्हिस, पुणे.

# अंक पहिला

## प्रवेश पहिला

[ खेडेगांवांतील रस्ता दाखविणारा पडदा. बाजूच्या विंगमध्येच नायक दौलतीचे घर आहे अशी कल्पना. स्टेजवर कोणी नाही. इतक्यांत दौलतीचा गुलहौशी दोस्त चंदर लगबगीने पण लपतछपत प्रवेश करतो. ]

**चंदर** : दौलतराव, अवं दौलती ! दौलू ... अरं ए ... दौल्या ... !

( दौलती येतो. )

**दौलती** : ( डाव्या हातांत दुधाची तवली घेऊन उजव्या बाहीने तोंड पुशीत ) का कोकलाय लागलास !

**चंदर** : आँ ! झालं का ? अर, फड हुबा न्हायला. वाजलं किती बगितलंस का ?

**दौलती** : तुज्यांत किती वाचलं ?

**चंदर** : रातीचं धा ! तुज्यांत ?

**दौलती** : कायमचं बारा !

**चंदर** : थोत्तेच्या ! बंद पडलं वाटतं ?

**दौलती** : पडलं न्हाई, पाडलं !

**चंदर** : कुनी ?

**दौलती** : दुसरं कुनी ? आबानं.

**चंदर** : हात् लेका. फुकट पैलवानकी, करतोयस बग !

**दौलती** : अरं, पैलवानकीच्या जोरावर घड्याळ न्हाई सुरू होत !

**चंदर** : आपुन केलं असतं गड्या !

**दौलती** : त्ये रं कसं ?

**चंदर** : अरं, मशीन बंद पडलं तरी काटा फिरवत बसलो असतो हातानं.

**दौलती** : अरं, पर किती दिवस ?

**चंदर** : अरं, काटा गरम हुईस्तंवर ! त्येला का येकदा ऊब आली की गपगुमान फिरतोय् आपल्या आपुन ! सांगतोय कुनाला !

**दौलती :** परं खरं सांगू चंदर, तमाशा भाईर गावात हुता त्येच बरं हुतं बग ! अरं, भाईरच्या भाईर कनेक्शन !

**चंदर :** का ? आनि गावात आल्यावर काय करंट बंद हुतोय काय ?

**दौलती :** तस न्हाई चंदर ते ! अरं पैलवानकीची मिळकत इष्काच्या झुगारात उदळतोय् मी, हे कानांवर गेलंय् आबाच्या !

**चंदर :** कानांवर जाऊ दे ! डोक्यावर न्हाई न्हवं !

**दौलती :** अरं, आजपातुर न्हवतं, पर आता गावातच तमाशा आल्यावर येन रच की.

**चंदर :** त्ये यील तवा यील ! आता त्येचं काय ? तू चल बगू. ( दंडाला धरतो. )

**दौलती :** ( सोडवून घेत ) अरं, म्हातारा घरात न्हाई तू—

**चंदर :** अरं, मग हे तर लई फस्कलास !

**दौलती :** नगं नगं ! बगितलं तर फाडून खाईल मला ! अरं मर्दा माल्या डावला गावलो तवा लई ताडताड बोलला ! अरं, एकदम गरम !

**चंदर :** मग, तू काय केलंस ?

**दौलती :** काय करनार ?

**चंदर :** गुमान बसला असशील !

**दौलती :** खरंच चंदर, आबाम्होरं बोलायला जीब उचलत न्हाई माजी.

**चंदर :** का रं ?

**दौलती :** लई केलंय् त्येनं माज्यासाठी ! मी बारा दिवसांचा असतानाच आई गेली माझी ! तवाधरनं डोळ्याचा दिवा न् हाताचा पाळना करून वाढवलं मला. घडीघडीला याद देतोय् त्यो ! सावकाराचं रीन काढून पैलवानकीत घातलं मला नि सवता चंदनावानी झिजतोय् माज्यासाठी !

**चंदर :** पर न्हाई कोन म्हनतय् ! अरं, दुपटीचा गडी दीड मिटांत मारून पांग फेडलंस की तू त्येचं !

**दौलती :** पांग फिटलं तरी रीन न्हाई फिटलं अजून !

**चंदर :** अरं, त्येबी फिटंल की !

**दौलती :** व्हय ! मीच चुकतं करणार हाय ते याजासकट ! आनि रीन फिटस्तंवर तमाशा बगायचा न्हाई असं ठरविलंय् मी चंदर !



**चंदर :** अरं, काय थापा मारतोयस मर्दा ! आता ढोलकी कडाडली नि घुंगरं थरारली की तुझी पेटंट लावनी हुईल सुरू ( चालीत ) 'सोळावं वरीस धोक्याचं ...' आनि मग होशील कावराबावरा...

**दौलती :** खरं हाय चंदर ! त्या लावनीनंच याड लागलंय् मला. त्या सोळा वर्षाच्या सोळा शिणगारानं घायाळ केलंय् मला... पर...

**चंदर :** आता ! आनि पर काय ?

**दौलती :** चंदर, म्हातारपनी आता आबाच्या उरावर कर्जाचा दगूड ठेवून मी जर गमजा मारायला लागलो .

**चंदर :** तर दगडू तसाच न्हाईल नि तुज्या जवानीची माती होईल माती ! अरं, ह्यो दगडमातीचा खेळ बंद कर नि जरा गुलाबाच्या ताटव्यातनं फीर... माज्यावानी !

**दौलती :** हूं हूं ! तुजं बरं हाय ! तू चंदर नि तुझी तारा...

**चंदर :** पर मंदी नुसता वारा...

**दौलती :** त्यो वाराबी परवडला ! माज्यावानी धन्या सावकाराचं भिताड तर न्हाई !

**चंदर :** अरं, त्ये भिताड तू लातंनं उडवशील पर तुजं पायबी हालंनात नि हातबी हालंनात ! वाला भिऊन !

**दौलती :** तुजं बेस हाय ! तुज्या बानं मरून तुज्यावर डोंगराएवढं उपकार केल्यात म्हनून काकाला धा येकराचा डाग मिळाला ! बानं डोळं मिटलं नि काकानं तुज्यासाटी पिशवी उगडली ! तुला रान मोकळंच की चरायला ! काकाचा डोळा जिमनीवर नि तुजा डोळा...

**चंदर :** चिमनीवर !

**दौलती :** माजं न्हाई तस !

**चंदर :** अरं, किती झालं तरी तू माजा दोस्त ! इष्काच्या रस्त्यानं मी येकला नाही जायाचा ! अरं, जाता जाता तुलाबी ब्याटरी दावीन ! ( बॅटरी लावून ) चल गुमान !

**दौलती :** पर...

**चंदर :** अरं, दुईरी फायदा हाय तुला.

**दौलती :** त्यो कुठला ?

**चंदर :** जराची नजर पडंल नि सावकाराचा डोळा फुटंल ! अलीकडं त्या धन्या सावकारानं लई लावलंय् तीन पाच—नाजुक मामल्यात !

**दौलती** : व्हय र ! त्येला मागंच दावणार होतो इंगा ! त्येचं दात एका डावात पाडून त्येला बजावणार हुतो, की सावकार, असल्या कवळ्या पोरीसंगं इष्क खेळायला नवी कवळी बसवून ये दातांची ! माज्या गजरासंगं लाडीगोडी ?

**चंदर :** राराराररा ! इतका भुललास !

**दौलती** : खरंच चंद्रया ! काय झंगड हाय रं पोरगी ! अक्शी गिर्रेबाज कबुतरच

**चंदर :** हां ! आता जरा तरन्यावानी बोललास बघ ! न्हाईतर तुजं वय हाय पंचवीस पर आकडयाचा वाईच घोटाळा झाल्यावानी बावन्न वर्सांच्या म्हाताऱ्यावानी बोलनं बोलतोयस्

**दौलती** : न्हाई चंदर ! त्या कबुतरानं घुमरी लावलिया काळजात ! थुई थुई नाचतंय् डोळ्यांम्होरं !

**चंदर :** अरं, त्ये कबूतर पोलादी मनगट सोदतंय् बसायला ! पर तुजा हात कुठं पुडं होतोय् ? अरं, खुळ्या पोरा, चैन केल्याबिगर चैन तरी कशी पडतीया तुला ?

**दौलती** : खरं सांगू, पयल्या भेटीतच मधाचं ब्वाट लावलंय् माज्या व्हटाला गजरानं !

**चंदर :** अरं, मग आता मधाचं पोळंच पिळून काड की दोनी हातानं ! अगदी भुवेच्या अंतरावर हाय ते !

**दौलती** : सारं कळतंय्... पर...

**चंदर** : वळत न्हाई! हात् लेका! अरं, आठ आठ तास तालमीत घुमणारा तू... इतक्यांत जोर बैठका इसरलास ?

**दौलती** : त्येच हितं काय काम !

**चंदर** : तर...! अरं, अशी बैठक मारून जोर काढायचं की यंव रं यंव...

( आबाची चाहूल लागते. दोघे सावरतात.)

**आबा** : ( प्रवेश करीत ) काय र ? तू आनि कसल्या जोरबैठका शिकवाय लागलास ?



**चंदर** : न्हाई! ...त्ये ह्यचं ह्ये... आपलं तालमीचं सांगत हुतो !

**आबा** : अरं, माज्या तालमीत तयार झालाय् त्यो ! आता तुजी तालीम नगं त्येला ! तुजं जोर मंजे ढोपरं फुटायचं काम, नि बैठका मंजे गुडगं निकळायचं काम !

**दौलती** : न्हाई आबा, तसलं काय ...

**आबा** : न्हाई न्हवं ! मला खात्री हाय रं ! पर वय बोंबालतंय् न्हवं मानसाचं !

**दौलती** : पर मी तसं ...

**आबा** : केलं न्हाईस ! सावरलास — पर कानोवर कुनकुन आलीया माज्या !

**दौलती** : पर... आबा—

**आबा** : मी न्हाई भीक घालत त्येला ! पर कानांडोळ्यांत चार बोटांचं अंतर असलं तरी तुज्यामाज्या वयांत चाळीस वर्सांचं अंतर हाय म्हणून म्हणतो !

**चंदर** : आबा, जरा मी मदी बोलू काय ?

**आबा** : नगं ! तुजं ठावं हाय मला ! अरं इट्टलरखमाईच्या देवळात गेलास तरी रखमाईकडंच तुझी नजर आदी जायची !

**चंदर** : बरं...न्हाईलं.

**आबा** : ( जवळ जाऊन ) दौलू...जेवलास ?

**दौलती** : व्हय !

**आबा** : दूद ?

**दौलती** : घेतलं.

**आबा** : खरं ?

**दौलती** : ( भांडे दाखवीत ) हे काय...!

**आबा** : बरं, जावा आता रानात. आनि हे बग, घोंगडं घे आनि येक. थंडी हाय झोंबनारी ! तबेतीचा केसबी बिगडू द्यू नगंस.

**चंदर :** बरं, मग मी जाऊ ?

**आबा :** अजून का थांबलायस ?

**चंदर :** न्हवं.. परवानकी घ्यायला.